# शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर.
# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम २०१९–२०

- **२१ जुन २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस**





२१ जुन २०१९च्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाप्रसंगी प्रास्ताविक करताना डॉ. एम.आर.दर्वे व मार्गदर्शन करताना योगशिक्षक श्री कोतीकुमार बोरकर तसेच कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

- **वृक्षारोपण कार्यक्रम**





**महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्षलागवड उपक्रमांतर्गत वनविभाग अर्जुनी/मोर.व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहभागातून मौजा–अरततोंडी येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप काकडे अध्यक्षीय मार्गदर्शन करताना तथा वृक्षलागवड कार्यक्रमात सहभागी रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयातील कर्मचारी.**

- ९ ऑगस्ट २०१९ क्रांती दिन रॅली



रासेयो स्वयंसेवकाची रॅली काढून शहरातील प्रमुख रस्त्यांवरुन पुढे शहीद स्मारक येथे नेण्यात आली.



अर्जुनी/मोर. येथील शहीद स्मारकावर संस्थाध्यक्ष श्री लुनकरणजी चितलांगे पुष्पचक्र अर्पण करताना

- दि. १३ ऑगस्ट २०१९ ला पूरग्रस्तांना अन्नधान्याची मदत






तरुण भारत
Bhandara-Gondia | 2019-08-20 | Page- 3
epaper.tarunbharat.net



## सातत्याशिवाय ध्येयप्राप्ती अशक्यच : चंद्रिकापुरे

◆ गोरेगाव, १९ ऑगस्ट

अद्ययावत तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांत विस्तारत असताना केवळ एका क्षेत्रापुरते ज्ञानाला सीमित ठेवून चालणार नाही. चौफेर ज्ञान विद्यार्थ्यांनी संपादित करणे गरजेचे आहे. अद्ययावत तंत्रज्ञानामध्ये ज्ञानाच्या परिभाषा बदलल्या आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द आणि प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवले ध्येय प्राप्त करणे अवघड नाही, असे प्रतिपादन मनोहर चंद्रिकापुरे यांनी केले.

लक्ष्मणराव चंद्रिकापुरे वि. जा. भ. ज. माध्यमिक आश्रमशाळा, घोटी गोरेगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मनोहर चंद्रिकापुरे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लक्ष्मणराव चंद्रिकापुरे, दुलाराम चंद्रिकापुरे, आर. बी. रामटेके उपस्थित होते.

चंद्रिकापुरे म्हणाले की, कुठलाही विषय किंवा क्षेत्र निवडा, पण त्यात कौशल्य दाखवा. तुमची वेगळी ओळख त्या क्षेत्रात निर्माण झाली पाहिजे. तेव्हाच तुम्ही यशस्वी व्हाल. गरिबीवर मात करण्यासाठी एकमेव पर्याय म्हणजे शिक्षण आहे. सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या पदावर जाण्याची स्वप्ने पाहावी व त्या दृष्टीने वाटचाल करावी, असे आवाहन चंद्रिकापुरे यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक आर. बी. रामटेके यांनी, संचालन एन. एस. मस्के यांनी केले. ◂(तभा वृत्तसेवा)

मदतीसाठी गोळा केलेले अन्नधान्य

## पूरग्रस्तांना अन्नधान्याची मदत

◆ अर्जुनी मोर, १९ ऑगस्ट

येथील शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राज्यातील पूरग्रस्तांना अन्नधान्याची मदत पाठविण्यात आली.

राज्यातील कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. बचाव कार्य संपत आले असले तरी छावण्यांमध्ये असलेल्या नागरिकांना जीवनावश्यक वस्तू शासनाकडून पुरविण्यात येत आहेत. शासनासोबत अनेक सेवाभावी संस्था देखील शक्य ती मदत देत आहेत.

पुराचे पाणी कमी झाल्याने रोगराई पसरू न देण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. या पुरामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ८ व सांगलीतील ४ तालुक्यांतील अनेकांच्या घरांचे व शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.

येथील नागरिकांजवळ उदरनिर्वाहासाठी काहीच राहिलेले नाही. अशा बिकट परिस्थितीत पूरग्रस्तांना मदत म्हणून येथील शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने अन्नधान्य गोळा करून पूरग्रस्तांना पाठविले आहे.

कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. आर. दवे, डॉ. पी. आर. भानसे, डॉ. एस. बी. बोरकर, प्रा. आशीष कावळे व विद्यार्थ्यांनी तांदूळ, गहू व डाळ असे मिळून २ क्विंटल १० किलो अन्नधान्य गोळा केले व पूरग्रस्तांना पाठविले. नागरिकांना नैसर्गिक आपत्तीतून बाहेर काढण्यासाठी केलेली ही मदत खरोखरच कौतुकास्पद आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

...राष्ट्राची ...र बडोले

...टकाचे आयोजन

उद्घाटक म्हणून राजकुमार बडोले बोलत होते. अध्यक्षस्थानी सभापती अरविंद शिवणकर होते. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष उमाकांत ढेंगे, जिप सदस्य रचना गहाणे, रघुनाथ लांजेवार, प्रकाश गहाणे, लायकराम भेंडारकर, डॉ. गजानन ढोंगरवार, जिप सदस्य कमल पाऊलझगडे, मंदा ...

## जिल्ह्यात ठिकठिकाणी स्वातंत्र्यदिन,

Powered by iDocuments

महाराष्ट्रातील कोल्हापूर व सांगली जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. या पुरामध्ये अनेकांच्या घरांचं व शेतीचे मोठं नुकसान झाले. उदरनिर्वाहासाठी अन्नधान्यदेखील उरले नाही. अशा परिस्थितीत दि. १३ ऑगस्ट २०१९ ला महाविद्यालयातील रासेयोच्या स्वयंसवेकांनी व सेवाभावी प्राध्यापकांनी मिळून तांदूळ, गहू व दाळ असे मिळून २ क्विंटल अन्नधान्य संकलित केले. त्यानंतर कोल्हापूरला पाठविण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांचे मार्फत कोल्हापूरला पाठविण्यात आले.

- २४ सप्टेंबर २०१९ : राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस






रासेयो स्थापना दिनानिमित्त अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कार्यकमाचे अध्यक्ष श्री लुनकरणजी चितलांगे व अतिथी कार्य. प्राचार्य डॉ. अश्विन चंदेल

- राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन






अर्जुनी/मोर. तालक्यातील मौजा पिंपळगाव/खांबी  या गावी दि. २० जानेवारी २०२० ला विशेष शिबीरात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने  रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.

- **दि. १२ ऑगस्ट २०१९ : आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त सिकलसेल व थॉयराईड तपासणी शिबीर**






थ्सकलसेल व थायराईड तपासणीसाठी नाव नोंदणी व रक्ताचे नमुने देताना देताना महाविद्यालयातील विद्यार्थी



आंतरराष्ट्रीय युवा दिन उत्साहात

किसान मानधन योजनेचे शिबिर उत्साहात

**महाविद्यालयात रा.से.यो. च्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने दि. १२ ऑगस्ट २०१९ ला सिकलसेल व थॉयराईड तपासणी शिबीर घेण्यात आले या शिबीरात १५० विद्यार्थ्यानी रक्ताचे नमुने देवून तपासणी केली. सर्व विद्यार्थ्यांना एक आठवडयानंतर त्यांचे अहवाल देण्यात आला.**

- **महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छतेसाठी रासेयोच्या वतीने श्रमदान**







महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छतेसाठी श्रमदान करताना रासेयो स्वयंसेवक

- **एड्स जनजागृती उपक्रम**



महाविद्यालयात दि. २ मार्च २०२२० ला रेड रिबन क्लबच्या वतीने व रासेयोच्या पुढाकारातून एड्स आजाराच्या जनजागृतीसाठी रेड रिबन क्लब वॉल तयार करण्यात आली. या भिंतीवर विद्यार्थ्यांनी संकलित केलेली अद्ययावत माहिती प्रसारीत करण्यात आली.




'एड्स जनजागृती' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. अमोल शामकुवर

- **८ मार्च २०२० ला जागतिक महिला दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन**







जागतिक महिला दिनानिमित्त आपले विचार मांडताना रासेयो स्वयंसेवक माधुरी भेंडारकर व मेघा जांभुळकर